**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार, दिनांक १८ मे २०२४**

**ठळक बातम्या**

1. **लोकसभा निवडणुकीच्या राज्यातल्या पाचव्या आणि अंतिम टप्प्याच्या प्रचाराची आज सांगता.**
2. **महाराष्ट्रात ४६ जागा जिंकू: काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांचं मुंबईतील इंडिया आघाडीच्या पत्रपरिषदेत प्रतिपादन.**
3. **राज्याचं लाडकं दैवत पंढरपूरच्या विठ्ठलाचं पदस्पर्श दर्शन २ जून पासून होणार सुरू.**
4. **२२ मे पर्यंत विदर्भाच्या सर्व जिल्हयात वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी.**

*****

प्रचार संपला

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात येत्या सोमवारी २० मे रोजी मतदान होणार आहे. यामध्ये राज्यातल्या उत्तर मुंबई, उत्तर मध्य मुंबई, दक्षिण मुंबई, दक्षिण मध्य मुंबई, वायव्य मुंबई, ईशान्य मुंबई, धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण आणि ठाणे या १३ मतदारसंघांचा समावेश असून, याठिकाणचा प्रचार आज संपला. या टप्प्यातल्या मतदानासाठी २४ हजार ५७९ मतदान केंद्र तयार करण्यात आले आहेत. राज्यातल्या १३ मतदारसंघांत दोन कोटी ४६ लाख एकोणसत्तर हजार ५४४ मतदार, आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत, तर २६४ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. आज प्रचाराचा शेवटचा दिवस असल्यानं सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी सभा, बैठका, रोड शो च्या माध्यमातून जोरदार प्रचार केला. महाराष्ट्र हा शाहू, फुले, आंबेडकरांचा आहे. तो शहा, मोदी आणि अदानींचा मी कदापि होऊ देणार नाही, असं प्रतिपादन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील विक्रोळी इथं बोलताना केलं. आज प्रचाराच्या अखेरच्या दिवशी त्यांनी विक्रोळी येथील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शाखेला भेट दिली. यावेळी आयोजित सभेत ते बोलत होते. गरीबी हटाव चे आश्वासन अनेक वर्षे सत्ता भोगूनही पूर्ण न करणाऱ्या

काँग्रेसला आजही पुन्हा तेच आश्वासन द्यावे लागत आहे. मात्र देशाचा मतदार काँग्रेसच्या भूलथापांना बळी पडणार नाही, असा विश्वास मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी व्यक्त केला. भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते आज बोलत होते. यावेळी डॉ.दिनेश शर्मा, भाजपा मुंबई अध्यक्ष आशिष शेलार उपस्थित होते. नाशिक लोकसभा मतदारसंघातले महाविकास आघाडीचे उमेदवार राजाभाऊ वाजे यांच्या प्रचारासाठी युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी काल नाशिक शहरात सभा घेतली. महाराष्ट्रात येणारे उद्योग हे गुजरात राज्यात पळवण्यात आले, अशी टीका त्यांनी यावेळी केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

महाराष्ट्रात महायुतीचे वातावरण आहे. मागच्या निवडणुकीत जितक्या जागा महायुतीच्या आल्या होत्या त्यापेक्षा जास्त जागा निश्चित येतील, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. आज प्रचाराची सांगता झाल्यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी दादर येथील स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळाचे दर्शन घेतले. यावेळी खासदार राहुल शेवाळे उपस्थित होते.

इंडिया आघाडी पत्र परिषद

आम्ही UPA सरकारच्या काळात देशात अन्न सुरक्षा कायदा आणला आहे. पुन्हा सत्तेत आल्यावर १० किलो धान्य मोफत देऊ आणि GST चा एकच दर लागू करू, अस आश्वासन काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत दिलं. सध्या निवडणूक जनतेची असून जनता ती लढते आहे. त्यामुळे राज्यातल्या ४८ पैकी सुमारे ४६ जागा महाविकास आघाडीला मिळतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांना लागणाऱ्या वस्तूंवर GST लादणार नाही, २५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार देऊ यासारख्या आश्वासनांचा पुनरुच्चार त्यांनी केला. संविधानानं दिलेलं आणि आर्थिक मागासांना दिलेलं आरक्षण कायम ठेवण्यासोबत राज्याराज्यातून आलेल्या आरक्षणांच्या प्रस्तावावर संबंधित आयोगांच्या शिफारसींनुसार योग्य निर्णय घेऊ असंही ते म्हणाले. देशातल्या सर्व जातधर्माच्या सर्व संस्था आणि वास्तूंचा सन्मान आमच सरकार करेल असं शरद पवार यांनी या पत्रकार परिषदेत सांगितलं. तर अयोध्येतील राम मंदिराच बांधकाम अपूर्ण असून आम्ही सत्तेत आल्यानंतर ते पूर्ण करू असं उद्धव ठाकरे म्हणाले. ४ जून पासून या देशात इंडिया आघाडीचे सरकार येईल आणि खऱ्या अर्थाने अच्छेदिन सुरू होतील, असंही ठाकरे म्हणाले. आम्ही सत्तेत आल्यावर महाराष्ट्राचं वैभव परत आणू असंही

त्यांनी सांगितलं. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस फोडाफोडीच्या मुद्द्यावरुनही त्यांनी भाजपावर टीका केली.

योगी आदित्यनाथ

देशात पुन्हा कॉग्रेसची सत्ता येईल असं कदापी होणार नाही. देशात मतदानाचे चार टप्पे पुर्ण झाले असून आता पाचवा टप्पा आहे. महाराष्ट्रातही या पाचव्या टप्प्यातील १३ जागांवर एनडीए आणि भाजपच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करुन आपण संसदेत पाठवावे, असं आवाहन उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी धुळे लोकसभा मतदारसंघातील जनतेला केलं. भारतीय जनता पक्ष आणि मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार खा.डॉ. सुभाष भामरे यांच्या प्रचाराची सांगता आज मालेगाव येथील योगी आदित्यनाथ यांच्या सभेने झाली.

विठ्ठल पदस्पर्श दर्शन

पंढरपूरच्या विठ्ठलाच्या पदस्पर्श दर्शनाची प्रतीक्षा आता संपली आहे. येत्या २ जून पासून विठ्ठलाचे थेट पदस्पर्श दर्शन सुरू करण्याचा निर्णय मंदिर समितीनं घेतला आहे. तर ७ जुलै पासून आषाढी साठी विठ्ठलाचे २४ तास दर्शन सुरू असणार आहे. मंदिर संवर्धनाच्या कामासाठी 15 मार्चपासून विठ्ठलाचे पदस्पर्श दर्शन बंद होते. या काळात दिवसातून केवळ पाच तास मुखदर्शन सुरू असायचे. आता मात्र दोन जून पासून विठ्ठलाचे पदस्पर्श दर्शन आणि संपूर्ण दर्शन व्यवस्था सुरु होणार आहे.

हवामान

येत्या २२ मे पर्यंत संपूर्ण विदर्भात वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या काळात सोसाट्याचा वारा आणि वादळ येणार असल्याने सतर्क राहण्यास सांगण्यात आलं आहे. दरम्यान बुलडाणा जिल्ह्याच्या तापमानात गेल्या काही दिवसांमध्ये वाढ होत आहे. या वाढत्या तापमानामुळे गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे नागरिकांना उष्माघातापासून स्वतःचा बचाव करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. याशिवाय आगामी काही तासात अमरावती बुलढाणा आणि अकोला या जिल्ह्यात वादळी पर्जन्यमान राहणार असून हलक्या पावसाच्या सरी बरसण्याची शक्यता आहे, असं हवामान विभागानं कळवलं आहे.

पाणंद रस्ते

यंदाचा पावसाळा सुरू होण्यास केवळ १३ दिवसांचा कालावधी उरला असून अकोला जिल्ह्यात मंजूर पाणंद रस्ते कामांपैकी १७ मेपर्यंत केवळ ३२ रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. तर १०२ कामे सुरू आहेत. उर्वरित ३०१ कामे होणे अद्याप बाकी असल्यानं, जिल्ह्यातील रस्त्यांची कामे पूर्ण कधी होणार याबाबत नागरिकांत चिंता व्यक्त होत असल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीनं दिली आहे.

आचार्य पदवी पूर्व परीक्षा

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीनं 16 आणि 17 मार्च, 2023 रोजी घेण्यात आलेल्या आचार्य-2023 पदवी पूर्व परीक्षेचा निकाल आज घोषित करण्यात आला आहे. सदर एम्पेट परीक्षा अमरावती विभागातील अमरावतीसह अकोला, बुलडाणा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांतील 13 परीक्षा केंद्रावर घेण्यात आली होती. परीक्षेला एकूण 4003 विद्यार्थी बसले होते. त्यापैकी 960 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून परीक्षेचा 23.98 टक्के निकाल लागला आहे. परीक्षेचा निकाल विद्यापीठ वेबसाईटवरील पी.एच.डी.पोर्टलवर तसेच विद्यापीठाच्या राजपत्र भाग-3 मध्ये उपलब्ध करुन देण्यात आला असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या प्रभारी संचालक यांनी दिली आहे.

जलसंवर्धन

'जलसंवर्धन- एक पहल,जो सवारे कल' ही जलजागृती विषयक मोहीम ऑरेंज सिटी वॉटर आणि ग्रीन व्हिजिल फाउंडेशनच्या सहकार्याने हाती घेण्यात आली. शहरातील नागरिकांना दररोज किमान तीन लिटर पाण्याचा संवर्धन करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी या मोहिमेचे आयोजन करण्यात आलं होतं. या अंतर्गत चित्रकला स्पर्धा आणि सामुदायिक सहभागाच्या उपक्रमांचा समावेश करून एकात्मता नगर, गंगा नगर, खलासी लाईन, संघर्ष नगर, भीमवाडी, कौशल्य नगर या भागात जनजागृती कार्यक्रम राबवण्यात आला.

आयपीएल

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा सामना चैन्नई सुपर किंग्स बरोबर संध्याकाळी साडेसात वाजता बंगळुरुच्या चिन्नास्वामी स्टेडिअमवर होणार आहे.

सीईटी

भारतीय तंत्रज्ञान संस्था दिल्लीच्या अबुधाबी संकुलात यंदा प्रथमच पदवीपूर्व अभ्यासक्रम सुरू होत आहेत. २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेची मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आली आहेत. या संस्थेत संयुक्त प्रवेश परीक्षा सीएईटी २०२४ किंवा संयुक्त प्रवेश परीक्षा जेईई २०२४ च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल.

कपाशी बियाणे

अकोला जिल्ह्यात कपाशी बियाणे विकण्यास कृषी विभागाच्या उपस्थितीत सुरुवात झाली आहे. बियाणे घेण्यासाठी कड़क उन्हात शेतकऱ्यांच्या रांगा दिसल्या. परंतु दुसऱ्याच दिवशी बियाणे  संपल्यानं शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त केली  जात आहे. जिल्ह्यातील काही भागात शेतकयांना प्रत्येकी २ अथवा अधिकाधिक ५ पाकिटे दिली जात आहेत.  अकोला शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील बहुताश भाग कोडवाहू शेती आहे, पावसाळा लवकरच सुरू होणार असल्याने सध्या शेतकऱ्यांची बियाणे खरेदीसाठी लगबग सुरू आहे.  आज कपाशी  बियाणे खरेदी करण्यासाठी शेतकरी बाजारपेठत  दाखल झाले असून बहुतांश कृषी सेवा केंद्रांवर त्यांना त्यांच्या आवडीचे कपाशी बियाणे उपलब्ध  नसल्याने शेतकरी वर्ग नाराज झाला असल्याचं आमच्या प्रतिनिधीने कळविल आहे.

पशुधनाची सर्वंकष माहिती

सर्व पशुधनाची सर्वंकष माहिती एका ठिकाणी उपलब्ध व्हावी. जेणेकरुन पशुधनामधील सांसर्गिक रोगांना प्रतिबंध आणि नियंत्रण अधिनियमन 2009 च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तसेच पशु आणि  पशुधन उत्पादनात वाढ करण्याच्या दृष्टीनं सर्व पशुधनाचे इअर टॅग करुन त्यांची नोंदणी भारत पशुधन प्रणालीवर करणे बंधनकारक असल्याचे आदेश वाशीमच्या  जिल्हाधिकारी बुनवेश्वरी एस. यांनी पारीत केले आहे.सर्व ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपालीकांनी 1 जुन 2024 नंतर पशुधनास पशुवैद्यकीय संस्था/ दवाखान्यामधुन पशुवैद्यकीय सेवा देउ नयेत. तसेच आपल्या अधिनस्त असलेल्या कत्तलखान्यामध्ये टॅग असल्याशिवाय म्हैस वर्गीय जनावराची कत्तल करण्यास परवाणगी देण्यात येवू नये, असं त्यांनी सांगितलं.

******